# मेट्रो-३च्या गाडीची प्रतीक्षा संपली



म. टा. प्रतिनिधी, मुंबई

बहुप्रतीक्षित कुलाबा ते सीप्झ मेट्रो-३ मार्गिकेवरील पहिली मेट्रो गाडी मुंबईत आणण्याची प्रतीक्षा आता संपली आहे. मेट्रो-३च्या मार्गिकेवरील चाचण्यांसाठी प्रोटोटाइप गाडीचे दोन डबे आंध्र प्रदेशातील कारखान्यात तयार आहेत. हे डबे ट्रेलर ट्रॅकवर लोड करण्यात आले असून कोणत्याही क्षणी मुंबईसाठी निघणार आहेत, असे मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनकडून (एमएमआरसी) सांगण्यात आले आहे.

मेट्रो-३ मार्गिकेवरील चाचणीसाठी डिसेंबर २०२१ अखेर पहिली मेट्रो गाडी मुंबईत दाखल होईल, असे गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनकडून (एमएमआरसी) सांगण्यात आले होते. मात्र मरोळ येथे उभारण्यात येत असलेल्या तात्पुरत्या कारशेडचे काम अपूर्ण असल्याने डिसेंबरमध्ये गाडी मुंबईत दाखल होऊ शकली नाही. त्यानंतर यंदा मार्च महिन्यात गाडी येईल, असे एमएमआरसीएलकडून जाहीर करण्यात आले होते. मात्र हा मुहूर्तही हुकला. मेट्रो गाडी तात्पुरत्या कारशेडमध्ये नेण्यासाठी मार्गातील काही झाडांच्या फांद्या तोडाव्या लागणार आहेत. त्याला पालिकेकडून परवानगी मिळण्यासाठी विलंब होत असल्याने गाडी मुंबईत दाखल होऊ शकली नाही. आता सर्व अडथळे दूर झाले असून आंध्र प्रदेश येथील श्री सिटी येथील कारखान्यातून डबे मुंबईसाठी निघण्यासाठी तयार आहेत. आगामी १२ ते १५ दिवसांत हे डबे मुंबईत दाखल होतील. मात्र पावसाचा अडथळा आल्यास प्रवासात आणखी काही कालावधी जाण्याची चिन्हे आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

## मुंबईत येण्यासाठी दोन डबे ट्रेलरवर तयार

मेट्रो-३ मार्गिकेवरील गाडी आठ डब्यांची आहे. यातील दोन डबे येण्यासाठी तयार आहेत. गाडी मुंबईत दाखल झाल्यावर मरोळ-मरोशी मार्गावर बांधण्यात येणाऱ्या तात्पुरत्या सुविधा जागेवरच उभी करण्यात येणार आहे. येथूनच मेट्रोच्या चाचण्या घेतल्या जाणार आहेत. पुढील महिन्यात मेट्रोच्या चाचण्यांना सुरुवात होण्याची शक्यता आहे. दरम्यान, राज्यात नवे सरकार आल्यानंतर त्यांनी आरेमध्येच मेट्रो-३च्या कारशेड उभारणीला हिरवा कंदील दाखविला. तसेच मेट्रो-३ मार्गिकेचा सीप्झ ते बीकेसी हा पहिला टप्पा डिसेंबर २०२३पर्यंत सुरू करण्याचे एमएमआरसीएलने जाहीर केले. त्या दृष्टीने त्यांनी तयारी सुरू केली आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या कामांना गती मिळण्याची चिन्हे आहेत.